# मिरा भाईंदर महानगरपालिका

पर्यावरण पूरक सण साजरे करूया,

मूर्ती विसर्जनाबाबत सूचनेचे पालन करूया !

स्वच्छ भारत
एक पाऊल स्वच्छतेकडे...

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्तिकार, उत्पादक व विक्रेते यांच्याकरीता मुर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक सुचना

मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्र. 96/2024 मध्ये पारित केलेल्या दि.09/06/2025 रोजीच्या आदेशान्वये राज्य शासनाला केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या तज्ञ समितीने दि. 21/05/2025 रोजी दिलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) मुर्ती विसर्जना संबंधी धोरणात्मक निर्णय तयार करण्यासाठी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने PoP मुर्ती विसर्जनाबाबच्या मार्गदर्शक सुचना तयार केल्या आहेत. सदर सुचनांमध्ये मा. उच्च न्यायालयाने काही बदल सुचवून दि. 24/07/2025 रोजी निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्तिकार उत्पादक व विक्रेते यांच्या करीता मुर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1. प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) मूर्तीचे उत्पादक व विक्रेते यांनी PoP ची मूर्ती विक्री करताना मूर्तीच्या मागील बाजूस, स्पष्टपणे दिसेल अशा स्वरुपाचे **तैल रंगाने (Oil Paint) लाल गोल** आकाराचे चिन्ह करावे.
2. प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) मूर्ती बनविणारे मूर्तीकार व विक्रेता यांनी मुर्तीची आतापर्यंत विक्री केलेल्या तसेच यापुढे विक्रीची माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेने तयार करुन दिलेल्या नमुन्यात नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील. सदरची नोंदवही महापालिका मागणी करील त्या वेळेस ती नोंदवही उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. (नोंदवहीचा नमुना खालील प्रमाणे आहे.)

**नोंदवहीचा नमूना**

**सन 2025-26**

**मुर्तिकार/उत्पादक/विक्रेतेचे नाव :-**

**पत्ता :-**

**मोबाईल क्र.**

**परवाना नोंदणी क्र :-**

**प्रभाग कार्यालय क्र :-**

| अ.क्र. | ग्राहकाचे नाव | पत्ता व मो. क्र. | मुर्तीचा प्रकार | | मुर्तीची उंची | Pop असल्यास Oil Paint ने लाल बिंदू आहे का? | माहिती पत्रक दिल्याबाबत ग्राहकाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शाडू माती | POP | | | |
| | | | | | | | |

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ साठी ३ ते १० लाख लोकसंख्येमध्ये मा

# मिरा भाईंदर महानगरपालिका

एक पाऊल स्वच्छतेकडे...

3. मुर्ती विक्रेत्याने प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) मुर्ती समवेत मुर्ती विसर्जनाबाबतची महापालिकेकडून पुरविण्यात आलेली माहितीपत्रिका प्रत्येक ग्राहकास द्यावी.
4. प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्तींचे उत्पादक व विक्रेते यांनी प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) पासून बनविण्यात येणाऱ्या घरगुती उत्सवांच्या, तसेच सहा फुटापेक्षा कमी उंचीच्या इतर सर्व मूर्ती केवळ कृत्रिम तलावातच विसर्जित करण्याबाबत नागरिकांना आवाहन करावे.

मि.भा.मनपा हद्दीत महापालिकेमार्फत तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांची यादी खालील प्रमाणे

| नैसर्गिक तलाव व कृत्रिम तलाव ठिकाणाची नावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मोर्वा तलाव | 7. | भाईंदर (पू.) जैसल पार्क चौपाटी (2) | 13 | एम.आय.डी.सी. सातकरी तलाव |
| 2 | राई राममंदिर तलाव | 8. | भाईंदर (पू.) जुनी खाडी जैसल पार्क (2) | 14 | काशिगांव जरीमरी तलाव |
| 3 | मुर्धा गांवदेवी तलाव | 9. | भाईंदर (पू.) एस.एन.कॉलेज समोरील तलाव नवघर | 15 | घोडबंदर उघाडी |
| 4 | भाईंदर (प.) नगरभवन तलाव | 10 | भाईंदर (पू.) गोडदेव तलाव | 16 | रेतीबंदर स्मशानभुमी घाट |
| 5 | भाईंदर (प.) राव तलाव | 11 | मिरारोड (पू.) शिवार गार्डन | 17 | चेना नदी |
| 6 | भाईंदर (प.) धक्का | 12 | पेणकरपाडा सुकाला तलाव | 18 | लक्ष्मीबाग पद्मावती तलाव |
| | | | | 19 | उत्तन समुद्र किनारा |

| नव्याने तयार करण्यात येणारे कृत्रिम तलाव ठिकाणांची नावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान | 4 | भाईंदर (पू.) आरक्षण क्र.246 | 7 | मिरारोड (पू.) जॉगर्स पार्क गेटजवळ |
| 2 | भाईंदर (प.) महेश्वरी भवन रोड | 5 | भाईंदर (पू.) स्व. आनंद दिघे मैदान, नवघर | 8 | मिरारोड (पू.) आरक्षण क्र.314 बाबासाहेब आंबेडकर मैदान |
| 3 | भाईंदर (प.) आरक्षण क्र.220 स्व, बाळासाहेब ठाकरे मैदानाच्या बाजुला | 6 | मिरारोड (पू) शिवार गार्डन (3) | | |

आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

राष्ट्रपतींद्वारे मिरा भाईंदर म.न.पा. देशात प्रथम क्रमांकाने सन्मानित

# मिरा भाईंदर महानगरपालिका

एक पाऊल स्वच्छतेकडे...

## नागरीकांकरिता सुचना

1. नागरिकांनी पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्याच्या व प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीकोनातून प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) पासून बनविण्यात आलेल्या घरगुती उत्सवांच्या तसेच सहा फुटापेक्षा कमी उंचीच्या इतर सर्व मुर्त्या महापालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावामध्येच विसर्जन कराव्यात.

मि.भा.मनपा हद्दीत महापालिकेमार्फत तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांची यादी खालील प्रमाणे

| नैसर्गिक तलाव व कृत्रिम तलाव ठिकाणाची नावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मोर्वा तलाव | 7. | भाईंदर (पू.) जैसल पार्क चौपाटी (2) | 13 | एम.आय.डी.सी. सातकरी तलाव |
| 2 | राई राममंदिर तलाव | 8. | भाईंदर (पू.) जुनी खाडी जैसल पार्क (2) | 14 | काशिगांव जरीमरी तलाव |
| 3 | मुर्धा गांवदेवी तलाव | 9. | भाईंदर (पू.) एस.एन.कॉलेज समोरील तलाव नवघर | 15 | घोडबंदर उघाडी |
| 4 | भाईंदर (प.) नगरभवन तलाव | 10 | भाईंदर (पू.) गोडदेव तलाव | 16 | रेतीबंदर स्मशानभुमी घाट |
| 5 | भाईंदर (प.) राव तलाव | 11 | मिरारोड (पू.) शिवार गार्डन | 17 | चेना नदी |
| 6 | भाईंदर (प.) धक्का | 12 | पेणकरपाडा सुकाला तलाव | 18 | लक्ष्मीबाग पद्मावती तलाव |
| | | | | 19 | उत्तन समुद्र किनारा |
| **नव्याने तयार करण्यात येणारे कृत्रिम तलाव ठिकाणांची नावे** | | | | | |
| 1 | भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान | 4 | भाईंदर (पू.) आरक्षण क्र.246 | 7 | मिरारोड (पू.) जॉगर्स पार्क गेटजवळ |
| 2 | भाईंदर (प.) महेश्वरी भवन रोड | 5 | भाईंदर (पू.) स्व. आनंद दिघे मैदान, नवघर | 8 | मिरारोड (पू.) आरक्षण क्र.314 बाबासाहेब आंबेडकर मैदान |
| 3 | भाईंदर (प.) आरक्षण क्र.220 स्व, बाळासाहेब ठाकरे मैदानाच्या बाजुला | 6 | मिरारोड (पू) शिवार गार्डन (3) | | |

2. सार्वजनिक मंडळामार्फत मोठ्या आकाराच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आल्यास सदर मुर्तीऐवजी विसर्जनासाठी प्रतिकात्मक स्वरुपात लहान मूर्तीचा वापर करावा. तसेच प्रतिष्ठापित मुर्तीचा वापर पुढील वर्षी करण्याकरीता आपणांस आवाहन करण्यात येते.
3. प्रदुषण होणार नाही याची दक्षता घ्यावी.
4. पुष्पहार आणि निर्माल्य पाण्यात न टाकता निर्धारीत निर्माल्य कलशात टाकावे.
5. उत्सव साजरा करताना ध्वनीप्रदुषण करणारी साधने वापरणे टाळावे.
6. स्वत:चा परिसर स्वच्छ ठेवावा व स्वच्छतेसाठी पालिकेच्या पथकांना सहकार्य करावे.
7. सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घ्यावी.
8. सर्वांसाठी हा उत्सव आनंदाचा आणि सुरक्षित असावा यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.
9. सर्व गणेशोत्सव मंडळानी आणि नागरिकांनी शासनाने निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करावे, असे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.
10. यंदाचा गणेशोत्सव पर्यावरण पूरक साजरा करण्याकरीता नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.
11. आपात्कालीन परिस्थितीत महापालिका आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा (आपात्कालीन क्रमांक / हेल्पलाईन क्र. 8657047402/ 8657949715/022-28117104)

आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर म.न.पा.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ साठी ३ ते १० लाख लोकसंख्येमध्ये मा. राष्ट्रपतींद्वारे मिरा भाईंदर म.न.पा. देशात प्रथम क्रमांकाने सन्मानित